*असंतुष्टांच्या टिकेला विकासाच्या माध्यमातुन उत्तर देणार – सुधीर मुनगंटीवार*
*पुन्हा संधी द्या चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे नंदनवन करेन – नानाजी शामकुळे*
*कोणत्याही पक्षाशी निष्ठ न राहणारा जनतेशी निष्ठ कसा राहणार – देवराव भोंगळे*
*गांधी चौकात महायुतीची विराट जनादेश सभा*
============================================================

गेली 5 वर्षे चंद्रपूर जिल्हयाचा, चंद्रपूर शहराचा विकास हीच माझी प्राथमिकता राहिली आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा सर्वच क्षेत्रात भरीव काम आम्ही केले आहे. जनतेची मागणी नसताना विकास केल्याची टिका काही असंतुष्टांनी केली. त्यांच्या टिकेचे उत्तर आम्ही विकासातुन देवू असे सांगत नानाजी शामकुळे या मतदार संघातून पुन्हा निवडून गेल्यास चंद्रपूर शहराच्या विकासासाठी 500 कोटींचे विशेष पॅकेज देवू, अशी ग्वाही अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. गांधी चौकातील जनादेश सभेत चित्रफीतीच्या माध्यमातुन त्यांनी नागरिकांना संबोधित केले.

गेली 5 वर्षे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या सहकार्याने मी चंद्रपूर शहराचा व संपूर्ण विधानसभा क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. जात, धर्म, पंथ असा भेद न बाळगता सर्व समावेशक पध्दतीने विकास करण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. आपण पुन्हा मला सेवेची संधी दिल्यास या विधानसभा क्षेत्राचे, चंद्रपूर शहराचे नंदनवन करेन, अशी ग्वाही चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातील भाजपा-शिवसेना-रिपाई (आ)-रासप महायुतीचे उमेदवार नानाजी शामकुळे यांनी दिली.

19 ऑक्टोबर रोजी चंद्रपूरातील गांधी चौकात महायुतीतर्फे विराट जनादेश सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे, महापौर सौ. अंजली घोटेकर, ओबीसी नेते डॉ. अशोक जिवतोडे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख संदीप गि-हे, शहर प्रमुख प्रमोद पाटील, मनपाचे स्थायी समिती सदस्य राहूल पावडे, भाजपात नव्याने प्रवेशित नेते प्रविण पडवेकर, सुरेश पचारे, बंडू हजारे, भाजपाचे सर्व मनपा सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे म्हणाले, गेल्या 5 वर्षात नानाजींच्या नेतृत्वात या चंद्रपूर शहराने व ग्रामीण भागाने अभूतपूर्व असा विकास अनुभवला आहे. वनअकादमी, बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र, डॉ. एपीजे अब्दुल कलाम निसर्ग उद्यान, दाताळा येथील केबल स्टेड पुलाचे बांधकाम, प्रियदर्शिनी नाटयगृहाचे नुतनीकरण, अमृत पाणी पुरवठा योजना अशी विकासाची मोठी मालिका त्यांनी तयार केली आहे. एका अपक्ष उमेदवाराने चंद्रपूरकर जनतेचा भावनिक छळ चालविला आहे. केवळ आमदार होण्याच्या हव्यासापोटी पक्ष बदलविणारा हा उमेदवार जनतेशी कसा एकनिष्ठ राहणार हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. कोणताही राजकीय पक्ष हा एक विचार असतो. त्या विचारांशी कार्यकर्ते वर्षानुवर्षे निष्ठेने बांधील राहतात. कधी कमळ, कधी धनुष्य असा रंग बदलत कॉंग्रेसच्या तिकीटासाठी सुध्दा अकांडतांडव केले. आता त्याच कॉंग्रेसचा व भाजपचा विरोध हा उमेदवार करत आहे. भाजप हा सेवेकरी कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आम्ही जनकल्याणाला, जनसेवेला, विकासाला आजवर प्राधान्य दिले आहे व भविष्यातही देवू, असे प्रतिपादन करत नानाजी शामकुळे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन देवराव भोंगळे यांनी केले.